मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महानगरपालिका टाकाऊतून साकारतेय नवनिर्मिती!

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभाग स्वच्छतेतून जपतोय परिसराची सुंदरता

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड शहरात स्वच्छता आणि सौंदर्यनिर्मिती यांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळत आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाने 'टाकाऊ वस्तूंपासून सर्जनशीलता' या संकल्पनेला नवचैतन्य देत, शहरातील टाकाऊ वस्तूंमधून आकर्षक कलाकृती निर्मितीचा उपक्रम मोठ्या उत्साहात राबवला आहे. या कलाकृती केवळ नजरेत भरणाऱ्या नसून पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता उपक्रमास देखील चालना देणाऱ्या ठरत आहेत.




शहरातील विविध कचरा संवेदनशील ठिकाणी हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आला आहे. यामध्ये ब क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग १७ बिजलीनगर, प्रभाग २२ शांती चौक काळेवाडी तसेच , इ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग ०५ सखुबाई गवळी उद्यान, आळंदी रोड, भोसरी येथे असलेली संवेदनशील ठिकाणे आता रंगतदार, देखण्या कलाकृतींनी सुशोभित झाली आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सफाई सेवकांनी केवळ स्वच्छता न करता, टाकाऊ टायर, प्लास्टिकचे डबे, बाटल्या, लोखंडी फ्रेम्स, पाइप्स यांसारख्या वस्तूंचा कल्पकतेने उपयोग करून उद्याने, रस्त्याकडील जागा आणि सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण केले. त्यांच्या कल्पकता आणि मेहनतीमुळे शहरात सौंदर्याची नवी उधळण झाली आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेची ही कलात्मक मोहीम इतर शहरांसाठीही प्रेरणादायी ठरत असून पुढील काळात अशाच अनेक सुशोभीकरण प्रकल्पांचे नियोजन सुरू आहे. टाकाऊ वस्तूंच्या कल्पक वापरातून पिंपरी चिंचवड शहर स्वच्छता आणि सौंदर्याचा नवा आदर्श निर्माण करत आहे.
> - डॉ. प्रदीप ठेंगल, उप आयुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

या उपक्रमासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, आरोग्य विभाग प्रमुख व उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, आरोग्य कार्यकारी अधिकारी व सहायक आयुक्त अमित पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आरोग्य अधिकारी राजेश भाट, सुधीर वाघमारे, श्रीराम गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक अतुल सोनवणे, भूषण शिंदे, आरोग्य निरीक्षक रूपाली साळवे, मुकेश जगताप आणि विकास शिरवाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

टाकाऊ वस्तूंचा सर्जनशील वापर केल्यास सुंदर परिवर्तन घडवता येते हे आरोग्य विभागाने आपल्या कृतीतून सहज दाखवून दिले आहे. या मोहिमेला नागरिकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नागरिकांच्या अशा सहभागामुळे शहरात 'स्वच्छतेतून सौंदर्य' असा सकारात्मक बदल दिसून येत आहे.

# कार्यकर्त्यांच्या बळावर "अब की बार 100 पार"; आमदार शंकर जगताप

## आमदारपदाची वर्षपूर्ती आणि कार्यकर्ता मेळाव्यामध्ये शंकर जगताप यांचा निर्धार..!

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या राजकीय जीवनाचा प्रवास 2007 पासून सुरू झाला. त्यानंतर अनेक जबाबदाऱ्या खांद्यावर पडत गेल्या. या जबाबदाऱ्यांना कार्यकर्त्यांचे पाठबळ मिळाले. तुम्ही सगळ्यांनी खांद्याला खांदा लावून माझ्यासोबत काम केले. माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलात. यामुळे प्रत्येक संघर्षाच्या प्रसंगी खंबीरपणे उभा राहिलो. याच कार्यकर्त्यांच्या बळावर आगामी महापालिका निवडणुकीमध्ये "अब की बार 100 पार" हा नारा आपल्याला पूर्ण करायचा आहे असा निर्धार थेरगाव येथील कार्यकर्ता मेळाव्यात पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी केला. थेरगावच्या याच व्यासपीठावर पुढील वर्षी महापौर, स्थायी समिती अध्यक्ष यांच्याही वर्षपूर्तीचा सोहळा आपण साजरा करू असा संकल्प देखील या निमित्ताने करण्यात आला.

आमदार शंकर जगताप यांच्या आमदारपदाची वर्षपूर्ती तसेच पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल थेरगाव, कामगार भावन येथे कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व मंडलाध्यक्षांच्या तसेच प्रभागातील सदस्यांच्या वतीने आमदार शंकर जगताप यांना सन्मानित करण्यात आले. मेळाव्याला विधान परिषद आमदार उमा खापरे, अमित गोरखे, पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी खासदार अमर साबळे, माजी महापौर माई ढोरे,



भाजपा महिला जिल्हाध्यक्ष सुजाता पालांडे, माजी पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, तुषार हिंगे, युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव, सचिन साठे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष कुणाल वाव्हळकर, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडेगिरी, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख काळुराम बारणे, ज्येष्ठ उद्योजक उमेश चांदगुडे तसेच भाजपचे सर्व जिल्हा पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य, मंडळ प्रमुख, मंडल कार्यकारणी सदस्य प्रभाग अध्यक्ष, बुधप्रमुख, सर्व आजी माजी पदाधिकारी, नगरसेवक कार्यकर्ते या निमित्ताने उपस्थित होते. कार्यकर्ता मेळाव्याच्या निमित्ताने महापालिका निवडणुकांसाठी मोठे शक्ती प्रदर्शन या निमित्ताने पाहायला मिळाले.

यावेळी बोलताना आमदार शंकर जगताप यांनी कार्यकर्त्यांचे कौतुक केले. या कार्यकर्त्यांच्या जीवावरच आगामी महापालिका निवडणुकीसाठी आपल्याला सामोरे जायचे आहे असे सांगून जगताप म्हणाले, की 2007 ते 2012 या कालावधीत मी सक्रिय राजकारणात सहभाग घेतला. या कालावधीत पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये नगरसेवक म्हणून काम केले. मात्र 1992 पासूनच दिवंगत लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्यासोबत राजकारणाचे धडे गिरवले आहेत. त्यावेळी पडद्यामागे आम्ही काम करत होतो. लक्ष्मणभाऊ तेव्हा नेहमी म्हणायचे की, "माझे भाऊ कार्यकर्त्यांप्रमाणे काम करतात आणि कार्यकर्ते मला भावासारखे आहे." हे वाक्य माझ्या मनात तेव्हापासून अक्षरशः कोरले गेले आहे. कार्यकर्ते माझे पाठीराखे, अगदी माझ्या भावाप्रमाणे आहेत. त्यांच्या पाठबळावरच आज हा महत्वाच्या टप्पा मी पूर्ण केला आहे. शंकर जगताप पुढे असेही म्हणाले, भारतीय जनता पक्ष हा एकमेव असा पक्ष आहे की जो तुमच्यातील गुणांना, कष्टाला आणि तुमच्या प्रामाणिकतेला नेहमीच दाद देतो. पिंपरी चिंचवड मधील उमा खापरे, अमित गोरखे या कार्यकर्त्यांना आमदार बनवून भाजपने हे सिद्ध केले आहे. तुमच्या सारखे देवदुर्लभ कार्यकर्ते आहोत. त्यामुळे येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीमध्ये आपण 100 सदस्य संख्या नक्की पार करू याची खात्री आहे असेही जगताप म्हणाले.

# कुदळवाडी परिसरातील मतदार स्थळपाहणीबाबत हरकत!

## अतिक्रमण कारवाई झाली, मग मतदार यादीत नावे कशी? आमदार लांडगे यांचे आयुक्तांना निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या भोसरी विधानसभा मतदार संघातील प्रारुप मतदार यादीत कुदळवाडी व परिसर प्रभाग क्रमांक 2 आणि 11 मध्ये झालेल्या स्थळपाहणीबाबत आमदार महेश लांडगे यांनी हरकत नोंदवली आहे. याबाबत महापालिका प्रभारी आयुक्त श्रावण हर्डिकर यांना लेखी निवेदन दिले आहे. तसेच, स्थळपाहाणी अहवालाबाबत प्रश्नही उपस्थित केले आहेत.

आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला दिलेल्या अर्जामध्ये म्हटले आहे की, महानगरपालिकेने फेब्रुवारी 2025 मध्ये कुदळवाडी परिसरात सुमारे 827 एकर क्षेत्रावर अनधिकृत अतिक्रमणावरील कारवाई केली होती. 8 ते 17 फेब्रुवारी दरम्यान एकूण 4 हजार 111 अतिक्रमण हटवण्यात आले, ज्यामध्ये 3 कोटी 60 लाख 58 हजार 746 चौ.फुट क्षेत्र अवैध अतिक्रमणमुक्त करण्यात आले.




"या भागातील जमीनदोस्त केलेल्या मिळकतींवर पूर्वी राहणाऱ्या मतदारांचा उल्लेख स्थळपाहणी अहवालात केला आहे का? किंवा याबाबत कोणतेही अद्ययावत दाखले प्रारुप मतदार यादीमध्ये दिसत नाहीत. त्यामुळे या भागातील काही मतदार स्थलांतरीत झाले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे."

आमदार लांडगे यांनी प्रशासनाला प्रभाग क्रमांक 2 आणि 11 मधील कुदळवाडी अतिक्रमण कारवाई केलेल्या भागात पुनः स्थळपाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवण्याची विनंती केली आहे.

आमदार लांडगे यांनी मांडलेल्या आकडेवारीतून दिसते की: प्रभाग क्रमांक 2 मधील 170, 171, 172 यादी भागांमध्ये 2024 मध्ये 4,048 मतदार होते. प्रारुप यादीमध्ये 4,078 मतदारांची नोंद आहे, परंतु योग्य स्थळ निरीक्षण केल्यास फक्त 650 मतदार राहण्याची अपेक्षा आहे. प्रभाग क्रमांक 11 मधील 62 ते 67 यादी भागांमध्ये 2024 मध्ये 8,536 मतदार होते, तर प्रारुप यादीमध्ये 8,350 मतदार आहेत; योग्य स्थळ निरीक्षण केल्यास अंदाजे 2,500 मतदार राहण्याची शक्यता आहे.



महेश किसनराव लांडगे
आमदार भाजपा, पिंपरी-चिंचवड.

जा.क्र.: ४९६०

दिनांक : २४/११/२०२५

प्रति,
मा. श्री. श्रावण हर्डीकर साहेब,
प्रभारी आयुक्त तथा प्रशासक,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

विषय:- भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत कुदळवाडी व परिसर प्रभाग क्रमांक 2 आणि ११ मधील स्थळपाहणी अहवालासंदर्भात हरकतीबाबत.

महोदय,

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक- 2025-26 च्या निमित्ताने निवडणूक विभागाने प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. मात्र, काही प्रभागांमध्ये स्थळपाहणीबाबत आमची हरकत आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने फेब्रुवारी- 2025 मध्ये कुदळवाडी येथे सुमारे 827 एकर क्षेत्रात अनधिकृत पत्राशेड आणि दुकानांवर कारवाई केली. दि. 8 फेब्रुवारी ते 17 फेब्रुवारी 2025 दरम्यान एकूण 4 हजार 111 अतिक्रमणांवर कारवाई झाली. यामध्ये एकूण 3 कोटी 60 लाख 58 हजार 746 चौरस फूट क्षेत्रावरील म्हणजे सुमारे 827 एकर क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये 2024 या वर्षभरात 29 बांगलादेशी घुसखोरांना आणि चार रोहिंग्यांना पोलिसांनी अटक केली. 2025 मध्ये यामध्ये आणखी वाढ झाली. या भागात देशविघातक हालचाली सुरू असल्याबाबत सुरक्षा यंत्रणांनी अधोरेखित केले होते. त्यामुळे या भागात अंदाजे 1 हजार एकर क्षेत्रावर सरसकट अतिक्रमण विरोधी कारवाई झाली आहे. यामध्ये आमपंचायत कक्षातील घरे, बांधकाम परवानगी घेतलेली मिळकती आणि भूमिपुत्रांच्या सदस्या घरांवर कोणतीही कारवाई झालेली नाही.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने आगामी निवडणुकीच्या निमित्ताने जाहीर केलेली प्रारुप मतदार यादी पाहता कारवाई झालेल्या परिसराबाबत आम्ही काही वस्तुनिष्ठ निरीक्षणे नोंदवली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

जनसंपर्क कार्यालय : ... भोसरी, पुणे-४११०२६
93 79 909090
landge.mahesh.k@gmail.com
www.maheshlandge.in

1357

> महानगरपालिका प्रशासनाने जर स्थळपाहणी केली असेल आणि अहवाल तयार केला असेल, तरी त्यात स्थलांतरीत मतदारांचा उल्लेख झालेला दिसत नाही. ही बाब निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी चिंताजनक आहे. राज्य निवडणूक आयोगाकडे ही हरकत नोंदवण्याची सूचना महापालिका प्रशासनाला केली असून, लवकरात लवकर योग्य पद्धतीने कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# भोसरी विधानसभेत 'आमदार चषक सोसायटी लीग 2025' चा थरार

## क्रिकेटचा महासंग्राम संपला; राज गॅलॅक्सी सोसायटीने पटकावला विजेतेपद!

**पिंपरी | प्रतिनीधी**

भोसरी विधानसभेचे लोकप्रिय हिंदुत्ववादी आमदार श्री महेशदादा लांडगे यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त प्रथमच 'आमदार चषक सोसायटी लीग २०२५' या भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रभाग क्रमांक ८ मधील सोसायटी धारकांसाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेत एकूण ३५ सोसायट्यांनी सहभाग घेतला होता. या निमित्ताने क्रिकेटच्या मैदानावर अतिशय रोमहर्षक आणि चुरशीचे सामने पाहायला मिळाले, ज्यामुळे सोसायटीमधील धुरंधर खेळाडूंचे कौशल्य आणि नागरिकांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

**स्पर्धेचा निकाल आणि बक्षिसे:**

अत्यंत उत्साहात पार पडलेल्या या स्पर्धेत विजेत्या संघांना आकर्षक रोख बक्षिसे आणि चषक देऊन




गौरवण्यात आले.

**क्रमांक विजेते संघ बक्षीस (रोख)**

प्रथम राज गॅलॅक्सी सोसायटी (पोलिस संघ) रु. २१,०००/- व चषक

द्वितीय पद्मप्रकाश सोसायटी रु. १५,०००/- व चषक

तृतीय महाराष्ट्र कॉलनी संघ रु. ११,०००/- व चषक

चतुर्थ संजीवनी कॉलनी संघ रु. ७,५००/- व चषक

यासह अनेक वैयक्तिक बक्षिसे प्रदान करण्यात आली. आणि प्रत्येक सहभागी संघाला (३५ सोसायट्यांना) विशेष ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले.

**मान्यवरांची उपस्थिती:**

या स्पर्धेच्या उद्घाटनासाठी आणि बक्षीस वितरण समारंभासाठी अनेक महत्त्वपूर्ण राजकीय आणि सामाजिक व्यक्ती उपस्थित होत्या.

### उद्घाटन सोहळा..

» आमदार महेशदादा लांडगे यांचे बंधू कार्तिकभाऊ लांडगे, प्रसिद्ध उद्योजक श्री प्रताप मामा मोहिते यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी संजय जी सातव, संजय जी भोसले, हनुमंत आण्णा लांडगे, माणिक पडवळ, वसंत टिळेकर, योगेश भाऊ लांडगे, अनिल सौन्डडे, निखिल काळकुटे, शिवराज लांडगे, संजय कडलग, बाबुराव लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

### बक्षीस वितरण समारंभ..

» पिंपरी चिंचवड शहराचे माजी महापौर श्री राहुल दादा जाधव, संतोष जी वरे, विठ्ठल नाना वाळुंज, उद्योजक राहुल जी शेंडगे, नितीन जी पिंपरकर, सत्यबोध जी बद्रायणी, श्री विजय जी भोसले, सुनिल जी घोडेकर, अवधूत जी जाधव, अतुल जी सपकाळ, अशोकजी मोरे, हरेश भाई पटेल, युवराज जी खोत, बाबासाहेब कोळसे, सचिन जी पाटील, श्री रामभाऊ मोटे, शामकांत भोर, शहा सर व अनेक मान्यवर उपस्थित होते. हा सोसायटी लीग क्रिकेटचा उपक्रम नागरिकांमध्ये एकता आणि खेळाची भावना वाढवणारा ठरला.

# सुट्टीच्या दिवशी काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना महापालिकेचा मोठा दिलासा

## शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आता त्या दिवसाचे दीडपट वेतन मिळणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला असून सणवार आणि इतर शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आता त्या दिवसाचे दीडपट वेतन मिळणार आहे. स्थायी समितीने हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी ठेवला होता आणि सभेने याला हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे सुट्टीच्या दिवशी काम करणाऱ्या हजारो सफाई कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभ मिळणार असून त्यांच्या दीर्घकाळच्या मागणीला न्याय मिळाला आहे.

काही दिवसांपूर्वी महापालिका प्रशासन आणि राज्य सफाई कर्मचारी आयोग यांच्यात झालेल्या बैठकीत सफाई कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वार्षिक सुट्ट्यांचा आढावा घेण्यात आला होता. शासन नियमांनुसार कर्मचाऱ्यांना सर्व शासकीय सुट्ट्या तसेच दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी सुट्टी देणे बंधनकारक आहे. मात्र सफाई कामगार हा विभाग पाच दिवसांच्या आठवड्यात मोडत नसल्याने शनिवारी सुट्टी देणे शक्य नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. याबाबत आयोगाच्या अध्यक्षांनी, शनिवारची सुट्टी देता येत नसेल तर त्या दिवशी काम घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त मोबदला द्यावा, अशा सूचना केल्या होत्या.



### प्रस्ताव बहुमताने मंजूर

» ज्या विभागांना पाच दिवसांचा आठवडा लागू होत नाही त्यात सफाई विभागाचाही समावेश असल्याने या कर्मचाऱ्यांकडून सुट्टीच्या दिवशी काम करून घेतल्यास अतिरिक्त वेतन देणे बंधनकारक ठरते. महापालिकेच्या कामगार कल्याण विभागाने याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करून तो स्थायी समितीकडे पाठवला होता. त्यानंतर हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला आणि बहुमताने मंजूर करण्यात आला.

### योग्य मोबदला मिळणे आवश्यक

» या निर्णयामुळे महापालिकेवर आर्थिक भार वाढणार आहे. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या वेतन खर्चात वर्षाला सुमारे साडेतीन ते चार कोटी रुपयांची वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र कामगारांच्या हितासाठी हा खर्च आवश्यक असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. सुट्टीच्या दिवशी सेवा बजावणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांची कामाची तीव्रता अधिक असल्याने त्यांना योग्य मोबदला मिळणे आवश्यक असल्याचेही अधिकारी सांगतात.

### उपक्रम कर्मचारी कल्याणाच्या दिशेने सकारात्मक

» आता सुट्टीच्या दिवशी शहर स्वच्छ ठेवण्यासाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य आर्थिक मान्यता मिळणार आहे. शहराच्या स्वच्छतेसाठी दिवस-रात्र झटणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या मेहनतीला मान देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. महापालिकेचा हा उपक्रम कर्मचारी कल्याणाच्या दिशेने सकारात्मक पाऊल म्हणून पाहिला जात असून सफाई कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शासन निर्णयात ज्या विभागांना पाच दिवसांचा आठवडा लागू होत नाही त्यात सफाई विभागाचाही समावेश असल्याने या कर्मचाऱ्यांकडून सुट्टीच्या दिवशी काम करून घेतल्यास अतिरिक्त वेतन देणे बंधनकारक ठरते. महापालिकेच्या कामगार कल्याण विभागाने याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करून तो स्थायी समितीकडे पाठवला होता. त्यानंतर हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला आणि बहुमताने मंजूर करण्यात आला.

या निर्णयामुळे महापालिकेवर आर्थिक भार वाढणार आहे. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या वेतन खर्चात वर्षाला सुमारे साडेतीन ते चार कोटी रुपयांची वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र कामगारांच्या हितासाठी हा खर्च आवश्यक असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. सुट्टीच्या दिवशी सेवा बजावणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांची कामाची तीव्रता अधिक असल्याने त्यांना योग्य मोबदला मिळणे आवश्यक असल्याचेही अधिकारी सांगतात. महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला असून सणवार आणि इतर शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आता त्या दिवसाचे दीडपट वेतन मिळणार आहे.

# महापालिकेचा 'हा' निर्णय लखपती उमेदवारांनाच परवडणार? मतदारयादीच्या किमतीने खळबळ

## अनामत रकमेपेक्षा मतदारयादीच महाग? महापालिका निवडणुकीत उमेदवारांची पहिलीच कसोटी

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीच्या मैदानात उतरणाऱ्या इच्छुकांना भराव्या लागणाऱ्या अनामत रकमेच्या कितीतरी अधिक पटीने मतदारयादीसाठी पैसे मोजावे लागणार आहेत. पालिकेने प्रारूप मतदारयाद्या जाहीर केल्यानंतर या याद्या इच्छुक उमेदवार व राजकीय पक्षांना उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र, या याद्या डाऊनलोड करण्यास उशीर होत असल्याने अनेक इच्छुकांनी याद्यांसाठी निवडणूक विभागाकडे पैसे भरण्यास सुरुवात केली आहे.

या याद्यांची किंमत ११ हजारांपासून तब्बल ४० हजारांपर्यंत आहे. त्यामुळे मतदार याद्यांची विक्रीतून महापालिका चांगलीच मालामाल होणार आहे. मतदार याद्या घेताना इच्छुकांचा खिसा मात्र रिकामा होणार आहे.प्रारूप मतदारयाद्या जाहीर झाल्यानंतर दोन दिवसांपासून इच्छुकांनी पालिकेत पैसे भरले असले तरी अद्यापही याद्या देण्यात आलेल्या नाहीत.

त्यामुळे याद्यांवरून विरोधकांकडून आरोप करण्यात येत आहेत. यादीतील गोंधळ उघड होऊ नये आणि हरकती घेण्याचा कालावधी कमी व्हावा म्हणून पालिका भाजपला अप्रत्यक्ष मदत करत असल्याचा आरोप केला जात आहे.

प्रारूप मतदारयाद्या जाहीर झाल्यानंतर पालिका प्रशासनाने त्या संबंधितांना तत्काळ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या याद्यांवर अभ्यास करून कोणत्या भागातील मतदार वगळले गेले, कोणता भाग इतर प्रभागात गेला, कोणत्या भागातील मतदार आपल्या प्रभागात आले, याचा इच्छुकांना अभ्यास करण्यास वेळ मिळतो. त्यानुसार यादीवर हरकत नोंदविली जाते. या हरकतींसाठी प्रशासनाने २७ नोव्हेंबरपर्यंत मुदत दिली आहे.

मात्र, यादी जाहीर झाल्यानंतर पहिल्या दोन दिवसांत ती मिळालेलीच नाही. त्यामुळे इच्छुकांकडून महापालिका प्रशासन याद्या का देत नाही यावरून आरोप केले जात आहेत. दोन दिवस वाया गेल्याने आता प्रशासनाने या वेळेची भरपाई म्हणून हरकतींसाठी दहा दिवसांची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी केली जात आहे



### प्रभाग ३८ सर्वाधिक महाग

» महापालिकेने जाहीर केलेल्या किमतींनुसार सर्वाधिक महाग यादी प्रभाग क्रमांक ३८ ची असून तिची किंमत तब्बल ४० हजार २६६ रुपये आहे. सर्वात कमी किंमत असलेली यादी प्रभाग २६ ची असून तिची किंमत ११ हजार ११८ रुपये आहे. प्रभाग ४१ च्या यादीची किंमत ३४ हजार ९९ रुपये असून प्रभाग ९ च्या यादीची किंमत ३२ हजार २८५ रुपये आहे.

# राजगुरुनगर नगरपरिषद निवडणुकीत ‘लिलाव’ची चर्चा

## राजगुरुनगरमध्ये धक्कादायक प्रकार घडल्याची चर्चा असून चक्क ‘लिलाव’ झाल्याचा आरोप पुढे येत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राजगुरुनगरमध्ये धक्कादायक प्रकार घडल्याची चर्चा असून नगरसेवक पदाच्या जागांसाठी चक्क ‘लिलाव’ झाल्याचा आरोप पुढे येत आहे. पुरुषांच्या जागेसाठी तब्बल १ कोटी ३ लाख रुपये, तर महिलांच्या जागेसाठी २२ लाखांची बोली लागल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. या सर्व प्रकारावर सत्ताधारी आणि विरोधक दोघेही मौन बाळगत असल्याने संशय अधिकच गडद होत चालला आहे.

शहरात सुरू असलेल्या चर्चेनुसार, प्रभागांमध्ये परस्पर साटेलोटे झाल्याने दोन्ही पक्षांनी “तेरी भी चूप, मेरी भी चूप” अशी भूमिका घेतल्याचे म्हटले जाते. कोणत्या प्रभागासाठी बोली लागली, त्यात कोण सहभागी होते, याबाबत अधिकृतरित्या कुणीच बोलण्यास तयार नाही.

खेड मधील एका मंदिरामध्ये नगरसेवक पदासाठी लिलाव करण्यात आला. हा लिलाव सहकार क्षेत्रातील अग्रणी असणाऱ्या बँकेच्या माजी पदाधिकाऱ्याने जिंकला. त्यानंतर हे नगरसेवक पद चक्क एक कोटी रुपयांमध्ये लिलाव करण्यात आले. आता बिनविरोध निवडणूक करून या पदाधिकाऱ्याला थेट सभागृहात पाठवले जाणार आहे. बोलीतून मिळणारी रक्कम शहराच्या विकासासाठी वापरण्यात येणार असल्याचा एकमुखी निर्णय झाल्याचेही बोललं जात आहे. मात्र त्यामागची प्रक्रिया, व्यवहार्य स्वरूप आणि पारदर्शकता याबाबत कोणतीही माहिती उघड केली जात नाही.

कोट्यवधींच्या बोलीची चर्चा होत असल्याने राज्य निवडणूक आयोगासमोरही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.या प्रकाराला आळा घातला नाही तर निवडणुकांच्या पदांसाठी लिलावाची नवी प्रथा सुरू होण्याची भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे हा प्रकार लोकशाहीची थट्टा करणारा आणि लाजिरवाणा असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. प्रत्यक्षात लिलाव झाला का, झाला असेल तर सहभागी कोण याबाबत प्रशासनाने आणि निवडणूक आयोगाने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.राजगुरुनगरमध्ये सुरू असलेला हा वाद निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करतो आहे. ज्या प्रभागांत माघार घेतली जाते, तिथेच हा लिलाव झाल्याची चर्चा खरी ठरते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




### खर्चमर्यादेवर मोठा प्रश्नचिन्ह

» नगरसेवक पदासाठी साधारण पाच लाख रुपयांची अधिकृत खर्च मर्यादा असताना, कोट्यवधींच्या बोलीची चर्चा होत असल्याने राज्य निवडणूक आयोगासमोरही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.या प्रकाराला आळा घातला नाही तर निवडणुकांच्या पदांसाठी लिलावाची नवी प्रथा सुरू होण्याची भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे हा प्रकार लोकशाहीची थट्टा करणारा आणि लाजिरवाणा असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

### तथ्य तपासण्याची गरज

» या संपूर्ण चर्चेतली सत्यता काय, प्रत्यक्षात लिलाव झाला का, झाला असेल तर सहभागी कोण याबाबत प्रशासनाने आणि निवडणूक आयोगाने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.राजगुरुनगरमध्ये सुरू असलेला हा वाद निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करतो आहे.

### बिनविरोध निवडीचा अंतिम दिवस

» बिनविरोध निवड घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने कोण-कोण माघार घेणार, आणि ज्या प्रभागांत माघार घेतली जाते, तिथेच हा लिलाव झाल्याची चर्चा खरी ठरते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नगराध्यक्षपदासाठी 14 वरून थेट 5 वर! इंदापुरात अपक्षांनी घेतली माघार

## नगरपरिषद निवडणुकीत अर्ज माघारी घेण्याच्या दिवशी इंदापूरमध्ये प्रबळ दावेदारांनी केलेली मनधरणी जोरदार यशस्वी ठरली

**पुणे | प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणुकीत अर्ज माघारी घेण्याच्या अखेरच्या दिवशी इंदापूरमध्ये प्रबळ दावेदारांनी केलेली मनधरणी जोरदार यशस्वी ठरली. अनेक अपक्षांनी स्पर्धेतून माघार घेतल्याने नगराध्यक्ष पदासाठी फक्त पाच उमेदवार, तर नगरसेवकांच्या 20 जागांसाठी 52 उमेदवार अंतिम रिंगणात राहिले आहेत. त्यामुळे इंदापूरमध्ये मुख्य सामना राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध कृष्णाभीमा विकास आघाडी असा रंगणार आहे.

मूळतः नगराध्यक्ष पदासाठी 14 तर नगरसेवक पदासाठी तब्बल 169 अर्ज दाखल झाले होते. छाननीअंती नगराध्यक्षांचे 3 आणि नगरसेवकांचे 19 अर्ज बाद झाले. त्यानंतर नगराध्यक्षपदासाठी 11 आणि नगरसेवकांसाठी 150 उमेदवार रिंगणात असल्याचे चित्र होते;’ मात्र अपक्ष उमेदवारांनी मतविभाजन होऊ नये म्हणून प्रमुख पक्षांनी सुरू केलेल्या संपर्क मनधरणी मोहिमेला आज यश मिळाले आहे.

शहरात मागील दोन दिवसांपासून राजकीय तापमान शिगेला पोहोचले होते. अपक्षांना पाठिंबा, विकास कामांवरील आश्वासने, गटनेत्यांमध्ये सलग चर्चा, मध्यस्थी अशा विविध पद्धतींनी दोन्ही प्रमुख पॅनेलनी परिस्थिती साधण्याचा प्रयत्न केला. अखेर या प्रयत्नांना मिळालेल्या प्रतिसादामुळे रिंगण सुटसुटीत झाले आहे. जनतेचे लक्ष आता सरळसरळ दोन प्रमुख आघाड्यांतील लढतीकडे वळले आहे. शहर विकासाचे प्रश्न, स्थानिक पातळीवरील गट-राजकारण, मतदारांचा कल, मागील पाच वर्षांचा कारभार आणि नव्या आश्वासनांची विश्वसनीयता-या सर्व गोष्टींवर अंतिम निकाल अवलंबून राहणार आहे. इंदापूरमध्ये आता निवडणुकीचा ‘क्लायमॅक्स’ रंगण्यास सज्ज झाला आहे.




### राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध कृष्णाभीमा विकास आघाडी

» नगराध्यक्ष पदासाठी : 5 उमेदवार, नगरसेवक पदासाठी : 20 जागा – 52 उमेदवार रिंगणात आहेत. यामुळे जनतेचे लक्ष आता सरळसरळ दोन प्रमुख आघाड्यांतील लढतीकडे वळले आहे. शहर विकासाचे प्रश्न, स्थानिक पातळीवरील गट-राजकारण, मतदारांचा कल, मागील पाच वर्षांचा कारभार आणि नव्या आश्वासनांची विश्वसनीयता-या सर्व गोष्टींवर अंतिम निकाल अवलंबून राहणार आहे. इंदापूरमध्ये आता निवडणुकीचा ‘क्लायमॅक्स’ रंगण्यास सज्ज झाला आहे.